**विषय क्रमांक** **परीक्षासमिती**

**दि.०९/०१/२०१३**

**माध्यमिक शालांत प्रमाणपत्र व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा, फेब्रुवारी-मार्च २०१३ परीक्षेसाठी समुपदेशकांची नियुक्ती करण्याबाबत . (परीक्षा-५)**

(ठराव:-

माध्यमिक शालांत व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा तणावमुक्त होण्याच्या दृष्टीने परीक्षा कालावधीत परीक्षांचा व अभ्यासाचा ताण व परीक्षेत नापास होऊ अशी भिती यामुळे विद्यार्थी दडपणाखाली असतात. त्यामुळे विद्यार्थी आत्महत्या सारख्या टोकाची भूमिका घेतात. या घटना टाळण्यासाठी व विद्यार्थ्यांनी दडपणरहीत वातावरणात परीक्षा द्यावी म्हणून विभागीय मंडळ स्तरावर समुपदेशन केंद्र व हेल्पलाईन मार्च २०१० च्या परीक्षेपासून विभागीय मंडळात सुरु करण्यात येत आहेत. त्यासाठी विभागीय मंडळाना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येतात. १) स्थानिक शाळातील/उच्च माध्यमिक विद्यालयातील उचित शिक्षकांची निवड समुपदेशक म्हणून करावी. २)विभागीय मंडळ कार्यक्षेत्रातील मुख्याध्यापकांच्या सभांचे आयोजन करावे. त्यामधुन मुख्याध्यापकांचे प्रबोधन करावे तसेच मुख्याध्यापकांनी त्यांच्या शाळेत/कनिष्ठ महाविद्यालयात इ.१०वी/१२वीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांच्या सभा आयोजित करुन पालकांचे प्रबोधन करावे अशा सूचना मुख्याध्यापकांना द्याव्यात. ३)पोस्टर्सचा वापर करावा इ.त्यानुसार फेब्रुवारी-मार्च २०१३ च्या परीक्षेत त्याचपध्दतीने समुपदेशन केंद्र उघडण्याबाबत विभागीय मंडळांना कळविण्यात यावे.

तसेच समुपदेशक केंद्र परीक्षेपूर्वी एक आठवडा आधी सुरु करावे व संपूर्ण परीक्षा कालावधीत सुरु ठेवावे. तसेच ऑनलाईन निकालाचा दिवस व तद्नंतर ६ दिवस सदर केंद्र कार्यरत ठेवावीत.

२१ (३)

विषय क्रमांक

परीक्षासमिती
दि.०९/०१/२०१३

**माध्यमिक शालांत प्रमाणपत्र व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा, फेब्रुवारी-मार्च २०१३ परीक्षेसाठी समुपदेशकांची नियुक्ती करण्याबाबत . (परीक्षा-५)**

(ठराव:-

माध्यमिक शालांत व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा तणावमुक्त होण्याच्या दृष्टीने परीक्षा कालावधीत परीक्षांचा व अभ्यासाचा ताण व परीक्षेत नापास होऊ अशी भिती यामुळे विद्यार्थी दडपणाखाली असतात. त्यामुळे विद्यार्थी आत्महत्या सारख्या टोकाची भूमिका घेतात. या घटना टाळण्यासाठी व विद्यार्थ्यांनी दडपणरहीत वातावरणात परीक्षा द्यावी म्हणून विभागीय मंडळ स्तरावर समुपदेशन केंद्र व हेल्पलाईन मार्च २०१० च्या परीक्षेपासून विभागीय मंडळात सुरु करण्यात येत आहेत. त्यासाठी विभागीय मंडळाना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येतात. १) स्थानिक शाळातील/उच्च माध्यमिक विद्यालयातील उचित शिक्षकांची निवड समुपदेशक म्हणून करावी. २)विभागीय मंडळ कार्यक्षेत्रातील मुख्याध्यापकांच्या सभांचे आयोजन करावे. त्यामधुन मुख्याध्यापकांचे प्रबोधन करावे तसेच मुख्याध्यापकांनी त्यांच्या शाळेत/कनिष्ठ महाविद्यालयात इ.१०वी/१२वीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांच्या सभा आयोजित करुन पालकांचे प्रबोधन करावे अशा सूचना मुख्याध्यापकांना द्याव्यात. ३)पोस्टर्सचा वापर करावा इ.त्यानुसार फेब्रुवारी-मार्च २०१३ च्या परीक्षेत त्याचपध्दतीने समुपदेशन केंद्र उघडण्याबाबत विभागीय मंडळांना कळविण्यात यावे.

तसेच समुपदेशक केंद्र परीक्षेपूर्वी एक आठवडा आधी सुरु करावे व संपूर्ण परीक्षा कालावधीत सुरु ठेवावे. तसेच ऑनलाईन निकालाचा दिवस व तद्नंतर ६ दिवस सदर केंद्र कार्यरत ठेवावीत. समुपदेशकांना परीक्षा कालावधीसाठी किमान १५ दिवस काम केल्यावर पूर्ण कालावधीसाठी एकवट रु.१०००/- मानधन देण्यात यावे तसेच निकालाच्या वेळेस रु.५००/- मानधन देण्यात यावे असे दि.२४/०१/२०१२ रोजी झालेल्या परीक्षा समितीच्या सभेत ठरले होते. त्यानुसार फेब्रुवारी-मार्च २०१३ मध्ये होणा-या परीक्षेसही वरीलप्रमाणे कार्यवाही करावी असे ठरले.

लिपिक | शाखाप्रमुख | शाखाधिकारी | सहसचिव | सचिव | अध्यक्ष